माणदेशी माणस

अभ्यास घटक (Modules)

माणदेशी माणसं : अभिव्यक्ती

द्वितीय वर्ष : कला

मराठी : **(IDS)**

प्रा.धोंडीराम जगन्नाथ दमामे

सहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग,

आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज,आष्टा

E-mail – drjaykardamame@gmail.com

Mob.-7580058959

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र

(सत्र ३ पेपर १)

माणदेशी माणसं व संवादप्रक्रिया

(सत्र ४ पेपर २)

झिम पोरी झिम व संवादप्रक्रिया

(शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून)

द्वितीय वर्ष : कला

मराठी : **(IDS)**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
प्रथमावृत्ती : २०१४
बी.ए.भाग-२ (मराठी IDS)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

☐ **प्रती : ५००**

☐ **प्रकाशक :**
डॉ. डी. व्ही. मुळे
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

☐ **मुद्रक :**
श्री. बी. पी. पाटील
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

☐ ISBN- 978-81-8486-540-0

★ दूर शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४ (महाराष्ट्र राज्य) (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सल्लागार समिती

प्रा. डॉ. एन. जे. पवार
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. पी. प्रकाश
मा. कुलगुरू,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्त विद्यापीठ, हैद्राबाद

प्रा. डॉ. के. एस. रंगाप्पा
मा. कुलगुरू,
मानसगंगोत्री विद्यापीठ, म्हैसूर

प्रा. डॉ. आर. कृष्णा कुमार
मा. कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
ज्ञानगंगोत्री, गंगापूर डॅमजवळ, नाशिक

मा. प्राचार्य डॉ. ए. एस. भोईटे
प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. डॉ. सीमा येवले
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २, ११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

डॉ. अनिल गवळी
अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील
अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे
अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. आर. जी. फडतरे
अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचार्य डॉ. ए. बी. राजगे
संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. डी. व्ही. मुळे
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री. एम. ए. काकडे
परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री. व्ही. टी. पाटील
वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. डॉ. अरुण भोसले (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अभ्यासमंडळ : मराठी

अध्यक्ष : **डॉ. अनिल पांडुरंग गवळी**
यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

- **प्रा. डॉ. राजन गवस**
  प्रमुख, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. एकनाथ बाबूराव आळवेकर**
  दत्ताजीराव कदम आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **डॉ. सुनील वामन चंदनशिवे**
  राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, सदर बझार,
  कदमवाडी रोड कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती सुमन कृष्णाजी चव्हाण**
  विश्वासराव नाईक महाविद्यालय, शिराळा, जि. सांगली
- **डॉ. शिवाजी महादेव होडगे**
  सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड,
  ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. संजय दशरथ पाटील**
  दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रकाश कुंभार**
  नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. बळवंत तुरंबेकर**
  डी. आर. माने महाविद्यालय, कागल

अभ्यास घटकांचे लेखक : सत्र तिसरे

माणदेशी माणसं व संवादप्रक्रिया

लेखक	घटक शीर्षक
डॉ. सुनील चंदनशिवे राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर	१. माणदेशी माणसं : व्यक्तिचित्रणे
प्रा. डॉ. एकनाथ बाबूराव आळवेकर दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी, जि. कोल्हापूर	२. माणदेशी माणसं : व्यक्तिचित्रणे
प्रा. डी. जे. दमामे आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा	३. माणदेशी माणसं : अभिव्यक्ती
डॉ. शिवकुमार सोनाळकर श्री शिव शाहू महाविद्यालय, सरूड	४. संवादप्रक्रिया १-२
सत्र चौथे **झिम पोरी झिम व संवादप्रक्रिया**	
प्रा. मांतेश हिरेमठ देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस अॅण्ड सायन्स कॉलेज, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली	१. झिम पोरी झिम : आशय
डॉ. विजय बापू गायकवाड मालती वसंतदादा कन्या महाविद्यालय, इस्लामपूर	२. झिम पोरी झिम : आशयसूत्रे
डॉ. धनंजयराव होनमाने क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल	३. झिम पोरी झिम : अभिव्यक्ती
डॉ. शिवकुमार सोनाळकर श्री शिव शाहू महाविद्यालय, सरूड	४. संवादप्रक्रिया ३-४

■ **संपादक** ■

डॉ. सुनील चंदनशिवे
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज,
कोल्हापूर

डॉ. अनिल गवळी
अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा,
अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

घटक क्रमांक ३

माणदेशी माणसं : अभिव्यक्ती

३.१ उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास

* ‘माणदेशी माणसं’ या कथासंग्रहातील माणदेशी माणसांची विविधता समजून येईल.
* ‘माणदेशी माणसं’ या कथासंग्रहातील व्यक्तिचित्रणे समजून येतील.
* ‘माणदेशी माणसं’ या कथासंग्रहातील माणदेशी समाजजीवन समजून येईल.
* ‘माणदेशी माणसं’ मधील भाषाविशेष समजून येतील.

३.२ प्रास्ताविक

व्यंकटेश माडगूळकर यांनी ‘माणदेशी माणसं’ या कथासंग्रहात माणदेशाच्या परिसरातील माणसांचे स्वभावविशेष, त्यांचे व्यवसाय, जगण्याच्या पद्धती, त्यांचा भाषिक आविष्कार चित्रित करताना तेथील निसर्गजीवन त्या माणसांच्या जीवनात घडणारे घटना प्रसंग, त्यांची मांडण्याची पद्धत अर्थात निवेदन शैली त्यांचे पोशाख, जनजीवन अगदी वास्तव रूपात आपल्या समोर उभे केले आहेत.

व्यंकटेश माडगूळकर छोट्या छोट्या आशयघन वाक्यातून बहुढंगी, बहुआयामी व्यक्तिचित्रे वाचकांसमोर साक्षात उभी करतात. १६ व्यक्तिचित्रणाच्या या कथासंग्रहातील अभिव्यक्तीचे स्वरूप विशेष पाहू ,

३.३ विषय विवेचन

व्यंकटेश माडगूळकर यांचा ‘माणदेशी माणसं’ हा १६व्यक्तिचित्रणात्मक कथांचा संग्रह १९४९ साली प्रकाशित झाला. व्यंकटेश माडगूळकर हे माणदेशच्या मातीत जन्मले, वाढले, त्या मातीतील माणसे त्यांना जशी दिसली, जाणवली, भेटली, बोलली, आवडली तशीच त्यांनी आपल्या शब्दात मांडली. माणदेशचा परिसर त्यांनी आपल्या लेखनातून साकार केला. त्यातील जीवनाचे विविध अगांनी विलक्षण संपन्नतेने चित्रण केले. त्यात अनेक प्रकारच्या घटनांचा समावेश आहे. ग्रामीण शेतकरी, माणूस, ब्राह्मण, मुसलमान, स्पृश्यास्पृश्य, बलुतेदार यांचे चित्रण केलेले आहे. त्यांच्या कथेतील माणसे मातीशी नाते सांगताना दिसतात. दारिद्र्य सोसणारी माणसे, जीवन उजाड करणारे दुष्काळ, संघर्ष, अतर्क्य घटना, प्राणी यांनी त्याची कथा गजबजलेली दिसते.

माणदेशच्या परिसरातील वेगळेपण त्यांच्या कथेमध्ये उठून दिसते. या परिसरातील समाजजीवनाशी, दुःखाशी, सहनशील, गांजलेले, वेडी-बिंद्री अशी माणसे आणि निसर्गाशी संघर्ष करणारी रूक्ष माणसे त्याच गावात आपआपसातील हेवेदावे, भानगडी, इर्षा, शेती, पिके, जनावरे, यांच्यामधून संघर्ष किती तीव्र असू शकतो याचे चित्रण दिसते. ग्रामीण समाजातील कृषिजीवनच न मांडता त्यांच्या कथेने स्पृश्यअस्पृश्यांचे जीवन आपल्या कथांच्यामधून रेखाटले आहे.

प्रस्तुत १६ व्यक्तिचित्रणात्मक कथामधून अभिव्यक्त होणारी माणदेशी माणसं त्यांचे कौटुंबिक जीवन, समाजजीवन, निसर्गजीवन, त्यांचे पोशाख, जनजीवन, व्यक्तिवर्णनपरता, निवेदन शैली, भाषेची विशिष्टता, म्हणी, वाक्यप्रचार, संवादात्मकता इ. अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

* व्यक्तिचित्रे

व्यक्तिचित्र हा वाङ्मयप्रकार ललित गद्यातील एक प्रकार आहे. अनेक लेखकांनी काल्पनिक व वास्तव जीवनातील व्यक्तींना समोर ठेवून व्यक्तिचित्रणे लिहिली आहे. या व्यक्तिचित्रामध्ये व्यक्तीच्या अंतर्गत व बाह्यस्वरूपाचा अभ्यास केला जातो.त्यातून त्या माणसांची अभिव्यक्ती स्पष्ट होती. अर्थात लेखकाला ती माणसं कुठं ना कुठं भेटलेली असतात. त्याच्याशी त्यांनी संवाद साधलेला असतो. ती माणसं त्यांच्या परिसरातील गावातील असतात. त्यामुळे त्यांचे कुटुंबजीवन, पेहराव, बोलीभाषा, जात, धर्म, व्यवसाय इत्यादीची पूर्ण माहिती लेखकाला असते. त्यामुळे ही व्यक्तिचित्रे उठावदार ठसठशीत होतात. यामध्ये वि.द. घाटे. पु.ल. देशपांडे, शिवाजी सावंत इ. नी मोलाची भर घातली आहे.

प्रस्तुत कथासंग्रहात अत्यंत दारिद्र्यात प्रामाणिकपणाने जीवन जगणारा, वयाने झालेला धर्मा रामोशी, बिलंदर परंतु नव्या मास्तरांच्यामुळे शाळेची गोडी लागलेला झेल्या, रस्त्याचा शिपाई (मैलकुली) म्हणून काम करणारा रामा मैलकुली, शाळा मास्तरची नोकरी सोडून तमाशाच्या फडात सामील होणारा नामा मास्तर, उदार, दयाळू परंतु स्वाभिमानी बन्याबापू, डामरट हिरवट डोक्याचा कोंडीबा गायकवाड, इरसाल धूर्त लबाडी करणारा शिदा चांभार, अत्यंत गरीब अनाथ निराधार मुलाण्याचा बकस, जमीन नाही, शिपायाच्या नोकरीत भागत नाही म्हणून घरफोडीत सामील होऊन शिक्षा भोगून आल्यानंतर पश्चात्ताप करणारा शिवा माळी, अगदी म्हातारपणात कष्ट करून जीवन जगणारी तांबोळ्याची खाला, दळभद्री जीवन वाट्याला आलेला रघु कारकून, स्वतःच्या मुलापेक्षा अस्वलावर प्रेम करणारा बाबाखान दरवेशी, स्वतः उपाशीपोटी जीवन जगून आपल्या प्रेक्षकांना आनंद देणारा ढोलकीपटू गणा महार, अडाणी हेकेखोर असा माझा बाप मधील नरसू तेली, स्वतःला सुख नसताना इतरांना प्रेम, माया देणारा त्यातच समाधान मानणारा बिटाकाका, ऐशारामी जीवन जगू पहाणारा गणा भापट्या, ही व्यक्तिचित्रणे

त्यांच्या जीवनातील वेगवेगळया घटना, प्रसंग, पोशाख, भाषा व्यवसायांनी कशी वेगळी आहेत याची उत्कृष्ट मांडणी वरील व्यक्तिचित्रणातून केली आहे.

* कौटुंबिक जीवन

माणदेश समाजजीवनाचा अभ्यास करताना तेथील कौटुंबिक जीवनाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. जसा प्रदेश बदलतो तसे कुटुंबपद्धतीमध्ये थोडे थोडे बदल आहेत हे जाणवते. समाजजीवनातील कुटुंब ही संस्था अतिशय महत्त्वाची आहे. माणसा-माणसांना नात्यांनी जोडण्याचे काम कुटुंब करत असते. पण ग्रामीण समाजजीवनातील कुटुंबामध्ये केवळ माणसेच गृहीत धरायची नसतात माणसांबरोबर कुत्रे, मांजर, बैल, गाय, म्हैशी, शेळ्या, मेंढ्या इत्यादी प्राणी सुद्धा येतात. कुटुंब घरामध्ये राहून विशिष्ट प्रकारच्या नात्याने बांधलेले असते. माणदेशी समाजजीवनातील कौटुंबिक जीवनातही स्तरीकरण आढळून येते. तरीही ही सारी माणसे कुटुंबात राहातात. दुःख पचवून सुखाला जणू वाकुल्या दाखवित कशी-बशी राहातात. हेसुद्धा वैशिष्ट्यपूर्ण वाटते.

'धर्मा रामोशी' या कथेत धर्मा रामोश्याचे कुटुंब खोपटामध्ये राहते. त्याचे कुटुंब असे नाहीच. या कथेमध्ये धर्माच्या कुटुंबात धर्मा व त्याची नवऱ्याने टाकून दिलेली मुलगी बजा राहते. या कुटुंबात दोघेच आहेत. यांचा उदरनिर्वाह गावातील श्रीमंत कुटुंबातील काही कामे करून चालतो. या कथेमध्ये असलेले निवेदकाचे कुटुंब श्रीमंत आणि मोठे दिसते. त्यांच्या घरामध्ये एकत्र कुटुंब पद्धती आहे. त्याचबरोबर त्यांच्या शेतात व गोठ्यात गडीमाणसे कामाला आहेत. माणदेशात अस्पृश्यांची कुटुंबे गावाच्या बाहेर खोपटात तर श्रीमंतांची कुटुंबे गावात वाड्यात किंवा घरात एकत्र कुटुंब पद्धतीने राहातात. भारतीय समाजरचनेचे एक प्रातिनिधीक दर्शन कोणत्याही गावात दिसते. तसेच ते माणदेशातही आहे.

'झेल्या' कथेत माणदेशातील कुटूंबामध्ये लहान असणारा झेल्या म्हशी राखण्याचं काम करत असतो. पण त्याच्या कुटुंबातील लोक त्याच्या शाळेची चौकशी करत नाहीत.

'रामा मैलकुली' कथेत रामाचे कुटुंब दारिद्र्यात जीवन जगताना दिसते. त्याच्या कुटुंबामध्ये आई, विधवा बहीण, भाचा, रामा इतकी माणसे आहेत. रामा मैलकुलीची बायको त्याच्या दारिद्र्याला कंटाळून घर सोडून जाते. त्याचे रामाला काहीही वाटत नाही. रामा भाच्याला सांभाळतो. अंमलदाराने दिलेली चपाती भाच्यासाठी घरी घेऊन येतो. हा नातेसंबंधातील जिव्हाळा दारिद्र्यातही त्याच्या ठिकाणी आहे. स्वतःला बायको-पोरं नसली तरी सुद्धा रामा विधवा बहिणीच्या मुलाला शाळेत शिक्षण देण्याचा विचार करतो. अशी रक्ताच्या नात्याने जोडलेली माणदेशी कुटुंबाची एक विशिष्टता वाटते.

'नामा मास्तर' कथेत नामा मास्तर शेजारच्या गावात शिक्षक आहे पण त्याचे कुटुंब बायको आणि दोन पोरं मात्र गावात राहतात. नामा मास्तर शनिवार-रविवारी गावाकडे जातो. त्याचा बाप पूर्वी वारलेला आहे. नामा मास्तरच्या बालपणी त्याचं कुटुंब मांगवाड्यात होते. नामा आणि गंगाराम मांग (वडील) आणि आई हे लोक राहत होते. पुढे नामा मास्तर आपले कुटुंब सोडून तमाशात त्रिकोण वाजवतो.

'मुलाण्याचा बकस' या कथेतील 'बकस' हा मुस्लीम कुटुंबातील पोरका मुलगा. गरीब, भोळसर व निष्पाप आहे. त्याचा बाप बाबालाल आणि मा वारलेली आहेत. त्यामुळे हा भोळसर बकस आपल्या चुलता-चुलतींच्या कुटुंबात राहतो. त्यांच्या शेतात काम करून शेळ्या राखतो. मगच त्याच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटतो. पण इतके काम करूनसुद्धा 'बकस'बद्दल चुलता चुलतीला प्रेम नाही. शेवटी बकस एकटाच शेतात झोपडी करून राहतो.

'बन्याबापू' या कथेत माणदेशातील श्रीमंत इनामदाराचे कुटुंब दिसते. इतर इनामदारांच्या कुटुंबाप्रमाणे हे कुटुंब मोठे नाही की, वाड्यात नोकर-चाकर नाहीत. बन्याबापूंचा वाडा भला मोठा आहे. पण त्या वाड्यात बन्याबापू, त्यांची विधवा सून सरूबाई आणि बापूंचा अडाणी पुतण्या. बस, सारी तीनच माणसं, एवढीच माणसं त्यांच्या कुटुंबात. पण या कुटुंबातील व्यक्तींच्या परस्पर संबंधाचे चित्रण येत नाही. गांधी वधानंतर या कुटुंबाची वाताहत झाली. वाडा जळाल्यानंतर मात्र बन्याबापू रानात झोपडी बांधून राहतात. मोडेन पण वाकणार नाही ही सरंजामी वृत्ती त्यांच्या ठिकाणी दिसून येते.

'कोंडीबा गायकवाड' या कथेत शेतजमिनीसाठी भावाचा खून करणारा कोंडीबा आहे. ज्यावेळी त्याची बायको कोंडिबाने खून केला म्हणून रडते तेव्हा हा कोंडीबा तिच्यावर डाफरतो आणि म्हणतो, ''गप, रडायला का झालं? अवंदा पीक चांगलं हाय. मळ्यात जुंदळ्याचं डांबार लागलंय, खंडी दीड खंडी दाणं येत्याल.'' दगडासारखे काळीज असणाऱ्या कोंडीबाला आपलं कुटुंब उपाशी राहाणार नाही याची काळजी होती हे ही लक्षात येते.

'शिदा चांभार' या कथेत शिदा चांभाराच्या कुटुंबात शिदा आणि बायको दोघेच येतात. गावगाड्यातील पारंपरिक चांभारकीचा व्यवसाय शिदा करत असतो. तरी त्याला आपला उदरनिर्वाह करण्यासाठी तडजोड करावी लागते. शिदा चांभार आपले कुटुंब चालविण्यासाठी अनेक लोकांना फसवून आपला गरिबीचा गाडा ओढत असतो.

'शिवा माळी' या कथेतील शिवा माळी गरीब असून शेतजमीन नसल्यामुळे पिचलेला आहे. त्याची बायको जोडव्यासाठी घट्ट धरते. आपल्या बायकोला आनंदी ठेवण्यासाठी शिवा माळी चोरी

करतो. गरिबीत कुटुंब चालविताना माणदेशी माणसाला किती पातळीवर संघर्ष करावा लागतो हे या कथेवरून लक्षात येते.

'तांबोळ्याची खाला' या कथेत तांबोळ्याच्या खालाचे कुटुंब असे नाहीच. अगोदर तिचा संसार व्यवस्थित चालला होता पण नवऱ्याने बाई आणून ठेवल्यानंतर खाला पहाटेची घर सोडून निघून येते. आणि एकटीचाच संसार सुरू करते. तिला गणगोत नाहीत. इतर कुटुंबाप्रमाणे तिच्या घरी पाहुणे येत नाहीत. ती जातीने मुस्लीम असली तरी हिंदूच्याप्रमाणे ती वागत असते. तिला हिंदूंचे सगळे रिती रिवाज माहिती आहेत. सोडलेला नवरा मेला हे कळताच खाला विधवेचे जीवन जगत राहते. कुटुंबात प्रत्यक्षात राहात नसतानाही कौटुंबिक नातेसंबंध जपण्याची, जगण्याची खालाची ही वृत्ती वैशिष्ट्यपूर्ण आहे.

'रघू कारकून' या कथेत रघूचं घराणं कुलकर्ण्यांचं. त्याचा बाप चांगला कर्तबगार माणूस होता. पण त्याच्या बापाच्या पाठीमागे कुटुंबाची वाताहत झाली. रघूला सांभाळणे भाऊ आणि भावजयला जड वाटू लागले. पुढे रघूने एकट्यानेच संसार थाटला. तो एकटा राहू लागला. बाई असल्याशिवाय घराला घरपण येत नाही म्हणून रघूने लग्न केले. पण रघूला सुख मिळाले नाही. रघूच्या घरात दोन मुले आली. पण पुढे त्याच्या कुटुंबाला गरिबीने ग्रासले. त्याला अफू खाऊन मरावेसे वाटते कारण रघूच्या बायकोने अमूक एका फलाण्याबरोबर सूत जमवलं होतं. समाजात आपली व कुटुंबाची नामुष्की होईल. अब्रू जाईल ह्या भीतीने तो आपले जीवन संपवायला तयार होतो. त्याचे कौटुंबिक जीवन उध्वस्त होते.

'बाबाखान दरवेशी' या कथेत फिरस्त्या दरवेशाचे कुटुंब चित्रित केलेले आहे. त्याचे कुटुंब मोठे आहे. तीन मुली आणि चार मुले आणि बायको असे नऊ जणांचे कुटुंब आणि एक अस्वल. त्यांच्या कुटुंबाला अस्वलाचा मोठा आधार आहे. तेच अस्वल त्यांच्या उदरनिर्वाहात महत्त्वाचे काम करते. म्हणून बाबाखान मुलांच्यापेक्षा अस्वलावर जास्त जीव लावतो. बाबाखानच्या घरात नवराबायकोची वरचेवर भांडणे होतात. त्यांच्या कुटुंबाला आपण गावाच्या जीवावर जगतो आहोत या भावनेने राहावे लागते. बाबाखानचे घर असे कुठेही नाही. तो भटक्या जमातीचा आहे. कधी कधी तो गावात पाटलाच्या शेतातल्या झोपडीत राहतो. माणदेशात, पोटासाठी पारंपरिक उद्योग म्हणून दारोदार, गावोगावी भटकणारे एका दरवेशाचे आगळे वेगळे कुटुंब या कथेत चित्रित झालेलं आहे.

'माझा बाप' या कथेत नरसू तेल्याचं कुटुंब आहे. त्यांच्या कुटुंबात तेली त्याची बायको आणि मुलगा एवढेच तीन लोक. त्यातील नरसू अंधश्रद्धाळू आहे पण त्याची बायको मात्र हुशार आहे. त्यामुळेच त्यांचा संसार सुखात चाललेला आहे. तेलाचा घाणा चालवून कष्ट करून ते पैसा मिळवतात. पण नरसू तेल्याला जगात काय चाललेले आहे हे कळत नाही.

'बिटा काका' कथेत दारिद्र्याने गांजलेला बिटा काका आणि त्यांचे दुर्दैवी कुटुंब आहे. बिटाकाका प्रेमळ व परोपकारी आहेत. पण कुटुंबात लहान मूल असेल तर ते कुटुंब खुलून दिसते. पण असे सुख या कुटुंबाला जास्त दिवस पाहता आले नाही. एखाद्या कुटुंबामध्ये अपवाद वगळता त्यांना कायम दुःख दिसते. बिटा काकांच्या कुटुंबाची अशीच अवस्था झालेली दिसते. वरचेवर येणारे संकट त्याने बिटा काका हैराण झालेला दिसतो. त्यांना कसलेही कौटुंबिक सुख-समाधान नाही.

'गणा भपट्या' या कथेतील गणा भपट्याचे कुटुंब मोठे आहे. त्यामुळे मोठ्या कुटुंबात एकट्या लहरी गणाला सांभाळणे कठीण जात नाही. त्यांचे पाटलांचे कुटूंब असल्याने त्याला काही कमी नाही. घरातील भाऊ एखाद्या कामाबद्दल धाक लावतात तेव्हा काही तरी कारणे सांगून गणा त्यातून पळवाट काढतो. एकत्र कुटुंबातील आळशी व्यक्तीचे चित्रण ही कथा करते. ''अलिकडे भावांनी या बाबतीत गणाला काही विचारायचे सोडून दिले होते. जमिनीत एवढे पिकते आहे, पाखरे खातात, गुरे खातात, उंदीर खातात, त्याचे काय? त्याची जशी हळहळ आपण करीत नाही तशीच हा खातो याचीही करू नये.'' अशी गणाबद्दल त्याच्या कुटुंबाची धारणा बनली आहे. गणासारखे एखादे माणूस लहान कुटुंबात असते तर त्याला असे करता आले नसते. पण त्याचे कुटुंब मोठे एकत्र असल्याने त्याला असे निवांत राहाणे शक्य झाले. गावगाड्यात अशी उदाहरणे आढळतात.

अशी विविध कौटुंबिक जीवनाची जाणीव 'माणदेशी माणसं' या संग्रहातील कथा करून देतात. म्हणूनच चंद्रकुमार नलगे या कथांबद्दल म्हणतात, 'बरड माणदेश, तिथला प्रखर दुष्काळ, माणसांच्या जीवनाची सतत पारध करायला पेटलेला तिथला निसर्ग, त्याशी झुंजत, झगडत जीवन तगत ठेवणारी तिथली विलक्षण माणसे, त्या माणसांचं पीळ पाडणारं त्रिखंड दैन्य या साऱ्या ज्वलंत वास्तवाचे जिवंत चित्रण हे माडगूळकरांच्या कथेचे वेगळेपण आहे.' चंद्रकुमार नलगे यांनी माडगूळकरांच्या कथेसंबंधी मांडलेले वरील मत समर्पक वाटते.

● समाजजीवन

'माणदेशी माणसं' या संग्रहातून दिसणारे व्यक्ती-समाज नातेसंबंध असेच परस्परावर अवलंबून असणारे एकमेकांशी एकरूप झालेले असे दिसतात. त्या परिसरातील माणसासंबंधी परिणामी तेथील समाजाविषयी आपल्याला विशेष माहिती मिळते ती कथातूनच. माणदेशात वारंवार येणारा दुष्काळ, स्थलांतर करणारी माणसे, माळरान, पाण्याचे कमी प्रमाण, कोरडवाहू शेती, आपआपसातील भांडणे, हेवेदावे यांचा निश्चितच तेथील समाजजीवनावर परिणाम झालेला आहे. माणदेशातील समाजजीवन निश्चितच वेगळे आहे. माणदेशात अनेक वैशिष्ट्ये आहेत पण त्या वैशिष्ट्यांपेक्षा येथील समाजजीवन वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या परिसरातील समाजजीवनापेक्षा येथील समाजजीवन काहीसे

वेगळे आहे.

'माणदेशी माणसं' संग्रहातील कथांतून भेटणारी ही चित्रविचित्र व वैशिष्ट्यपूर्ण माणसे गावगाड्यातील माणसे आहेत. माणदेशी माणसांवर त्या समाजजीवनाची आणि वेगळेपणाची झाक दिसून येते. प्रस्तुत कथासंग्रहामध्ये ती स्पष्ट जाणवते. परिस्थितीने गांजलेली, दारिद्र्यात जगणारी माणसे हे माणदेशी समाजजीवनाचे प्रमुख वैशिष्ट आहे. माणदेशातील माणसांचा संघर्ष दारिद्र्याशी आहे. एक वेळच्या पोटाची भ्रांत आणि अंगावर धडुतं नसणारी माणसे माणदेशी समाजातील आहेत.

त्यामध्ये 'धर्मा रामोशी' आहे. त्याची मुलगी बजा आहे. खोपटात राहतानासुद्धा अंगभर धडुतं न मिळावे इतके दारिद्र्य या रामोशी समाजात दिसते. पण गरिबीने धर्मा रामोशी कुणापुढेही हात पसरत नाही. त्याच्या उरात रामोशी जमातीचा एक निब्बरपणा कायम आहे. जोपर्यंत धर्मा काम करत होता तोपर्यंत त्याला पोटभर भाकरीचा तुकडा मिळत होता. पण जेव्हा त्याचे हातपाय थकले तेव्हा मात्र त्याला पोट भरणे जड होऊन बसते. त्यातच आणखी भर म्हणजे नवऱ्याने टाकून दिलेली मुलगी बजा आहे. दोघांचे पोट भरण्याची जबाबदारी 'धर्मा रामोशी' या म्हाताऱ्यावर आहे. पण धर्मा चिवटपणे भाजीचा लगदा पोटात ढकलत जगत राहतो. समाजात त्याचा स्तर खूपच तळातला आहे.

'रामा मैलकुली' सुद्धा दारिद्र्याने पिचलेला आहे. तो आपल्या विधवा बहिणीला आणि भाच्याला सांभाळतो. त्यांचे कुटुंब चालवताना त्याला अडचणी येतात. गावगाड्यातील बलुतेदारी करून त्याचे पोट भागत नाही. म्हणून तो सरकारी नोकरीत मैलकुलीचे काम करतो. रामा जाड व्हंडीच्या भाकरी आपली पोटाची भूक भागविण्यासाठी आणतो. रामा मैलकुलीच्या गरिबीला कंटाळून त्याची बायको त्याला सोडून गेलेली आहे. पण त्यातून मार्ग म्हणून रामा दुसरे घर थाटण्याच्या विचारात दिसत नाही. गरिबी असली तरी त्याला आपले घर, गांव, सोडून देशांतराला जाण्याचीही तयारी नाही. कारण त्याला आपले गाव सोडवत नाही. तो याही परिस्थितीत आपल्या पांढरीशी एकनिष्ठ आहे. ही एक वेगळी सामाजिकता आहे. अंमलदाराचे सगळे ओझे तो घेतो पण त्यांच्या भाकरीला तो स्पर्श करीत नाही. कारण तो अस्पृश्य आहे. यातून माणदेशात स्पृश्य अस्पृश्य ही पारंपारिक विषमता कशी मूळ धरून होती याचे प्रत्यंतर येते.

'नामा मास्तर' या कथेतील नामा मांग जातीतील आहे. जातीच्या सवलतीने शिक्षक होतो. पण त्याचा बालमित्र यंकटरावला मात्र तो विसरत नाही. पुढे कलंदर नामाचे शिक्षकी पेशात मन रमत नाही म्हणून भाऊ मांगाच्या तमाशात तो त्रिकोण वाजवायचं काम करतो. नामा एक कलासक्त जीव आहे. तो लोककलाकार आहे. त्याला शिक्षकाच्या नोकरीपेक्षा तमाशात काम करण्याची आवड आहे. या कथेत माणदेश समाजजीवनातील व्यक्तींची अत्यंत दयनीय अवस्था दिसून येते. नामा

मास्तर शिकला तरी त्याची भाषा मात्र सुधारलेली नाही. त्या काळच्या समाजात लावणीला अश्लील म्हणून पाहिले जात होते. नामा शाळेत असताना गुरूजींनी त्याला लावणी म्हटली म्हणून मारले. नामाचे घर मांगवाड्यात होते. तेथे त्याचा बाप गंगाराम मात्र कुलकर्ण्यांच्या लहान पोराला आदराने बोलत असतो. दलित सवर्ण, शिक्षण आणि लोककलावंत यांचे उभे आडवे धागे या कथेत येतात.

'मुलाण्याचा बकस' हा मुस्लीम जातीचा एक भाबडा जीव. माडगूळकरांच्या कथातून हिंदू-मुस्लिम भेदाचे चित्रण नाही. मुस्लिमांना खेड्यात गावगाड्यातील बलुतेदारीतील एक घटक म्हणून ओळखले जाते. ही ग्रामजीवनाची एक विशिष्टता आहे. बकसला जमीन-जुमला आहे. पण त्याचा चुलता त्याचा छळ करतो. चुलता त्याच्याकडून काम करून घेत असतो. पण त्याला काहीही देत नाही. हा भोळसर बकस कसेतरी जीवन जगतो. चुलता त्याला वेड लागलेले आहे म्हणून पाठीवर डागण्या देऊन आणतो. शेवटी त्या बकसचे समाज काय करतो? हे मात्र समजत नाही. माणदेशी समाजातील बकस ही भोळीभाबडी माणसं मुक्या प्राण्यांसारखे जीवन जगतात हे लक्षात येते.

माणदेशातील खेड्यांमध्ये ब्राह्मणांना आणि इनामदारांना मोठा मान आहे. हे 'बन्याबापू' या कथेवरून लक्षात येते. माणदेशात गांधीवधानंतर ब्राह्मणांची वाताहत झाली. बन्याबापूंनी सोप्यात उभा राहून हाक मारली तर म्हारंपोरं त्यांच्यासाठी धावायची. माळगूडकरांची ही कथा एका सरंजामदार ब्राह्मणाला रंगवताना दिसते. गतकालीन वैभवाचे आठव बन्याबापूंना बेचैन करतात. म्हणून बन्याबापू दुःखी आहेत.

माणसाच्या साऱ्या दुःखाचे मूळ दारिद्र्य आणि अज्ञान हेच आहे. या दोन आघातांनी आडवी झालेली पण पुन्हा उठून चिवटपणे झुंज देणारी माणसे माणदेशी समाजजीवनात आढळून येतात. हा माणदेशी मातीचा गुणधर्मच बनून राहिला आहे. दुःख भोगायची अफाट शक्ती माणदेशी माणसांच्या ठिकाणी आहे. येथील माणसांच्या वाट्याला आलेले भोग सोशिकपणे सोसायचे एवढेच ठाऊक आहे. आणि ते भोग भोगताना ही माणसं पिचून जात नाहीत. त्यांच्यामध्येही एक चिवट जीवनासक्ती आहे. रामा मैलकुलीची बायको अस्तुरी त्याच्या गरिबीच्या नाचारगती संसाराला कंटाळून माहेरी निघून जाते. पण त्या अस्तुरीची वास्तपुस्त सुद्धा रामा मैलकुली करत नाही आणि तिला आणण्याची सुद्धा तो तयारी दाखवत नाही.

शिवा माळ्याचीही अशीच स्थिती आहे. शिवानं चोरी केल्यावर ''मी चोरट्या दादल्यापाशी राह्याची नाही.'' म्हणून त्याची बायको निघून जाते. तेव्हा तो म्हणतो, ''सरळ हाय दादा तिचं. तिला दोष कशापायी द्यावा.'' 'शिवा माळी' जमीन नाही म्हणून चोरी करतो तर 'कोंडीबा गायकवाड' जमिनीसाठी भावाचा खून करतो. 'बिटा काका' जमीन नाही म्हणून दुःखी आहे. तर मुलाण्याचा

बकस चुलत्याच्या शेतात राबतो आहे आणि जगतो आहे. या माणसांना जगणे, टिकून राहणे हेच मोठे वाटते.

'तांबोळ्याची खाला' नवऱ्याने दुसरी बायको आणली म्हणून पहाटेचीच घरातून निघून आली. पण समाजात ती एकटी जीवन जगते. जातीने मुस्लीम असून तिला हिंदूचे रितीरिवाज माहिती आहेत. तिची कोणतेही कष्ट करून जगण्याची तयारी आहे. खाला सोशिक, समजूतदार आणि माणसांची लोभी व कष्टाळू आहे. 'रघू कारकून' ला आपल्या बायकोने व्याभिचार केलेला आवडत नाही. तो तिला समजावून न सांगता आपण स्वतःच अफू खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो. पत्नी व्याभिचारी नसावी. नामुष्की वाट्याला येते ही पारंपरिक सामाजिक धारणा रघूच्या रक्तात भिनली आहे. तर 'बाबाखान दरवेशी' माणदेशी समाजजीवनातील एक वेगळे व्यक्तिचित्र आहे. ज्या गावकऱ्यांच्या अन्नावर तो जगतो त्याची जाणीव त्याला आहे. बाबाखान करमणूक करतो आणि भीक मागतो. गावातील प्रत्येक माणसाला तो सरकार, मालक असे आदराने बोलवतो.

माणदेशी समाजामध्ये अंधश्रद्धा मोठ्या आहेत. या अंधश्रद्धा 'माझा बाप' 'गणा भपट्या' या कथेत आहेत. गणा भपट्या कुठेतर एखादे पुस्तक वाचून बंगाली विद्या शिकतो. कधी अद्दल घडली तरीसुद्धा त्याच वाटेने जाण्याचा प्रयत्न हा तरूण पोरगा करतो. माणदेशी समाजात कष्ट करून सुद्धा पोटाला न मिळणारी माणसं तर कधी वेगळ्या मार्गाने पैसा मिळविण्याचा प्रयत्न करणारी माणसे माणदेशी समाजातील आहेत. चिवटपणे जगण्यासाठी झगडत राहाणे आणि टिकून राहाणे हा या माणसांचा स्थायीभाव दिसतो आणि तो सर्व समाजस्तरांतून जाणवतो.

• निसर्गचित्रण

कृषिसंस्कृती हा ग्रामीण साहित्याचा केंद्रबिंदू असल्याने ग्रामीण कथेतूनही या कृषिसंस्कृतीचे दर्शन घडत राहाते. कृषि आणि निसर्ग यांचे नातेही अतूट आहे. म्हणून तर ग्रामीण कथेत निसर्गचित्रणास प्राधान्य मिळालेले आढळून येते. 'माणदेशी माणसं' कथासंग्रह अभ्यासल्यानंतर माणदेशातला निसर्ग वैशिष्ट्यपूर्ण आहे आणि निसर्ग हे कथेतील जणू एक पात्रच आहे. याची खात्री पटते. व्यंकटेश माडगूळकरांची कथा आणि त्या कथेमध्ये भेटणारा निसर्ग यांचे नाते अतूट आहे. निसर्ग कथेपासून अथवा कथेतील व्यक्तिचित्रापासून वेगळे काढता येत नाही. हे माडगूळकरांच्या एकंदर कथात्मक साहित्याचे वैशिष्ट्य आहे. म्हणून चंद्रकुमार नलगे म्हणतात; ''निसर्ग हा प्रथमच पात्र बनून चित्रित झालेला माडगूळकरांच्या कथांत वावरतो.'' व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहामधून निसर्ग वजा करता येणार नाही. हे त्यांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे. व्यंकटेश माडगूळकरांनी माणदेशातला नदीकाठ, माळरान, नेप्ती यांना

बोरीची झुडपे, जांभळ, लिंब आपल्या कथेतून शब्दरूप दिले. 'मुलाण्याचा बकस' या कथेतून साकारलेला निसर्ग पहा.

'पक्की सडक नाही. त्यामुळे मैलांचे धोंडे नाहीत. ओबड धोबड गाडीवाट आहे. आजुबाजूला सारा बोडका माळ आहे. पाच मैलांच्या प्रवासात तहान लागली तर वाटेला कुठं पाणी मिळत नाही. झाडं सुद्धा सावली होतील अशी नाहीत. नेप्ती बोरीची बारीक सारीक झुडपं आहेत. दुपारच्या वेळी निघालं म्हणजे सगळ्या वाटेत माणूस क्वचितच दृष्टीस पडतं. चुकून-माकून एखादा मेंढक्या आणि मुंड्या खाली घालून गवत खाणारी त्यांची मेंढरे जवळपास दिसतात. एरवी सारा शुकशुकाट.' या वर्णनातून माणदेशाच्या उजाड, रूक्ष परिसराचे प्रत्ययकारी चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. माणदेशात वारंवार दुष्काळ पडतो, याचा परिणाम तेथील पीक-पाण्यावर आणि शेतीवर होणे अपरिहार्यच आहे.

माणदेशात पौष महिन्यात थंडीचा कडाका जाणवतो लोकांच्या दारिद्र्यामुळे ती थंडी अधिकच बोचरी होते. कारण त्यांना अंथरूण पांघरूणाची अडचण असते. पौषामधील थंडीचे वर्णन 'धर्मा रामोशी' या कथेत आलेले आहे. ''महिना उलटला. पौषातली थंडी जीव खाऊ लागली. दिवस मावळायला अंगावर चढलेली घोंगडी सकाळी दिवस उगवून न्याहारीची वेळ झाली तरी खाली उतरेना.''

माणदेशात सतत दुष्काळ असतो. पण शेतकरी जमिनीची मशागत करायचा थांबत नाही. त्यात पाऊस पडला तर मग मात्र पिकांचा डौल काही औरच असतो. 'मुलाण्याचा बकस' कथेत शेतीचे वर्णन माडगूळकर पुढीलप्रमाणे करतात. ''मुलाणकीचे काळे डाग जोंधळ्याच्या ताटांनी हिरवेगार झाले. पोटऱ्यातून कणसं फुटली, त्यांच्यावर निळा-जांभळा फुलोरा आला, दाणा भरला, माचव्यावर उभा राहून पाखरं हाकलण्यासाठी बकसनं केलेला आरडाओरडाही माझ्या कानावर आला.'' असा हा निसर्ग पेरणीपासून पाखरं राखणीपर्यंत मोजक्या दाणेदार वाक्यातून त्यांनी रंगविला आहे.

माणदेशात पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने येथे घराजवळ झाडे दिसत नाहीत. क्वचित एखादं जास्वंदीचं फुलझाड, शेवग्याचं, लिंबाचं झाडं घरापुढे असलेले दिसते. ब्राम्हणांच्या वाड्यापुढे मात्र तुळशी वृंदावन हमखास दृष्टीस पडते. गावाच्या शेजारी ओढा असेल तर त्याला बारमाही पाणी नसते पण वर्षातला काही काळ पाणी असते तेव्हा मात्र गावकरी त्या पाण्याचा पुरेपूर वापर करतात. ओढ्याकाठी करंजीची-पिंपरणीची झाडे तर शेताच्या बांधावर लिंब, चिंच, पिंपरण-बाभळ, अंबाडी-केकताडीची, निरगुडी, तरवडाची झाडे माणदेशाच्या निसर्ग समृद्धीमध्ये भर घालतात. पिंपरणीला पालवी फुटल्यानंतर पिंपरण सुद्धा सुंदर दिसते. येथील शेतीत गव्हाचे उत्पन्न होत असल्याने रानातील काड्या, फांद्या व गव्हाचे काड यांनी शेकारलेली घरे माणदेशात दिसतात. नेपती-बोरीची झुडपं माळरानावर पाण्याशिवाय तग

धरून असतात.

माणगंगा नदी ही माणदेशातील एकमेव नदी पण या नदीला फक्त पावसाळ्यातच पाणी असते. उन्हाळ्यात मात्र माणगंगा कोरडी होते. शेतीच्या पाण्यासाठी विहीरीवरच अवलंबून रहावे लागते. विहीर हाच प्रमुख सिंचनाचा स्त्रोत दिसतो. पण घराजवळ पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून आडही माणदेशात आहेत.

माणदेशाकडे बघितल्यानंतर हा नैसर्गिकदृष्ट्या शापित प्रदेश आहे का? असे वाटावे इतपत हा प्रदेश भकास आहे. या सर्व निसर्गाचे चित्रण व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहामध्ये आलेले आहे.

● जनजीवन

माणदेशातील परिसरातील लोकांचे पोशाख खास विशेष असत नाही. 'धर्मा रामोशी' फक्त धोतर नेसतो. सगळे शरीर उघडेच असते. 'झेल्या' कथेतील झेल्या डोक्याला टोपी, अंगात कसले कसले डाग पडलेले, मळलेलं, बाहीवर ठिगळं लावलेलं, हातमागाच्या कापडाचं कुडतं त्याला शोभेलशीच तांबड्या गादीपाटाची चड्डी असा पोशाख माणदेशातील सामान्य कुटुंबातील मुलांचा दिसतो. रामा मैलकुली ''कसल्या तरी रंगाचं एक विटकं फडकं त्यानं केवळ सवयीनं डोक्याला गुंडाळलेलं होतं. जागोजाक चिंध्या झालेली एक पैरण अंगात अडकवली होती आणि खालचं धोतर तर त्याला अगदीच तोटकं होतं.'' असा त्याचा पोशाख.

माणदेशात कोट घालणे म्हणजे श्रीमंतीचं लक्षण समजले जाते. अशी माणदेशातील पोशाखाची विशेषता आहे. हे या परिसराचे व समाजजीवनाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

माणदेशच्या परिसराचा दुष्काळाशी कायमचा संघर्ष चालू आहे. कधीही माणगंगा नदी भरून वाहत नाही. कधी पाऊस पडलेला वर्णन नाही. सतत पोटाच्या ओढाताणीत माणसं असतात. पोटासाठी पायी भटकंती करून लोक आपले पोट भरतात. तांबोळ्याची खाला गावोगावी फिरून जीवनोपयोगी साहित्य विकते. माणदेशात गावात दुकाने नाहीत. तालुक्याच्या गावात बाजार आहे. मात्र इतरत्र असे फिरस्ते आहेत. त्यांच्याबरोबर भटकंती करणारे मागते सुगीच्या दिवसात येतात. लोकांचे मनोरंजन करून पोट भरतात. बाबाखान दरवेशी हे एक त्याचे उत्तम उदाहरणे आहे.

माणदेशाच्या परिसरात रामोशी, मांग, माळी, धनगर, महार, कुंभार, लोहार, सुतार, बामण, मराठा या जातीतील लोक आहेत. व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं' संग्रहात या साऱ्यांनी हजेरी लावली आहे. मुस्लीम सुद्धा माणदेशात आहेत पण जाती-धर्मामध्ये सलोखा आहे. तसेच येथे स्पृश्य-

अस्पृश्य भेदभाव पाळतात. अस्पृश्यांनी स्पर्श केलेले अन्न खात नाहीत. 'धर्मा रामोशी' कथेतील संवाद यासाठी पाहता येईल.

''आई, तिनं दळलेलं दळण चालणार तुला?''

''अरे, एवढा मोठा खटाला आहे. गडी माणसांसाठी रानात पाठवायच्या भाकरी करता येतील त्या पिठाच्या!''

माणदेशच्या परिसरात बलुतेदारी पद्धत आहे निर्मनुष्य अशी सगळी राने माणदेशात आहेत. माणदेशात दारिद्र्य आहे पण येथील माणूस स्थलांतर क्वचित करतो. माणदेशच्या मातीशी तो प्रामाणिक राहून कष्ट करून जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. माणदेशाच्या परिसरात यात्रा-जत्रा भरतात येथे लहान मुले, लोक पायी चालत जातात. लहान मुले मोठ्यांच्या खांद्यावर बसून यात्रा बघायला जातात. यात्रेत कलिंगड, ऊस, शेवचिवडा, चिरमुऱ्याचे लाडू विकायला आलेले असतात.

गांधीवधाच्या दंगलीचा परिणाम माणदेशच्या परिसरावर झालेला दिसतो. ब्राह्मणांचे वैभव लयाला गेले. गावाची शोभा वाढविणारे ब्राम्हणांचे वाडे त्या दंगलीत खाक झाले. गावेच्या गावे ओस पडली. त्यामुळेच तर माणदेशातील वैभव निघून गेले. 'बन्या बापू' या कथेत गांधीवधाच्या दंगलीचा परिणाम झालेल्या वाड्याचा उल्लेख आला आहे.

- **वर्णनपरता**

माडगूळकरांच्या कथेतील प्रसंग पाहिल्यानंतर त्यांच्या कथेत वेगळेपणा जाणवतो आणि त्यांची कथा वेगळीच अनुभूती देते. कारण त्यांच्या कथेतील एखाद्या प्रसंगाचे वर्णन करण्याची विशेष लकब होय. कथा वाचताना तो प्रसंग डोळ्यासमोर उभा करण्यात माडगूळकर यशस्वी होतात. सांकेतिक अशा प्रतिमांचा उपयोग करून ते प्रसंगाचे वर्णन करतात. हुबेहूब शब्दांच्या साहाय्याने माडगूळकर एखाद्या प्रसंगाला शब्दरूप देतात. चित्रकाराप्रमाणे वाचकांच्या समोर प्रसंगांना शब्दरूप देतात. म्हणूनच 'माणदेशी माणसं' कथासंग्रहाला शब्दचित्रे असेही म्हणतात. मोहन पाटील 'माडगूळकर चित्रकथी आहेत.' असे म्हणतात. चित्रकथी ज्या प्रमाणे चित्रे दाखवून त्याचे वर्णन करतो त्यापद्धतीनेच माडगूळकर सुद्धा चित्र दाखवून वर्णन केल्याप्रमाणे कथा रेखाटतात. 'अंगापिंडानं थोराड असून त्याचा रंग अगदी ठार काळा होता. नाक डाव्या बाजूला वाकडं होतं आणि एक डोळा अधू होता. त्याच्या तोंडावरच्या कळेकडं पाहून कुणालाही असं वाटलं असतं की, दिलानं भला असलेला हा माणूस रूपानं गेला आहे. असे चित्रकथीप्रमाणे माडगूळकर कथा सांगतात. त्यांच्या कथेबद्दल म. द. हातकणंगलेकर म्हणतात, ''त्या त्या कथेतील कथाशयाशी संवादी, विशिष्ट वातावरणाचा, जीवनसंस्कृतीचा गंध जाणवणारी अशी विशिष्ट भाषारूपे त्यातून साधली आहेत आणि त्यातील वैविध्य लक्षणीय आहे. त्यामुळेच

त्यांचे लेखन अर्थपूर्ण होते.'' त्यांच्या कथेबद्दल अरविंद गोखले म्हणतात, ''भाषेचा अस्सल मराठी वाण, शब्दांची मोजकी व नेमकी ठेवण, दोनचार वाक्यांत निसर्ग अगर व्यक्ती सजीव करण्याचे सामर्थ्य, आटोपशीर पण बोलके संवाद, स्वप्नाळू भावविश्व व बोधपूर्ण निवेदन, वाचताना वृत्ती खिळवून टाकणारे जीवनदर्शन अशा अनेक गुणांची विनटलेली कथा लिहून व्यंकटेश माडगूळकरांनी मराठी कथेत व विशेषतः ग्रामीण विषयावरील ललित साहित्यात एक नवेच युग सुरू केले.'' ओघवत्या भाषाशैलीच्या साहाय्याने, त्यांनी माणदेश परिसरातील ग्रामीण समाजजीवन, ग्रामीण भाषेतच त्यांच्या सुखदुःखासह चित्रित केले. प्रसंगी त्यांनी प्रमाणभाषेचा वापर केला पण कथेची परिणामकारकता कुठेही कमी झालेली नाही हेच त्यांच्या वाङ्मयीन शैलीचे विशेष होय.

३.४ वाङ्मयीन विशेष

प्रस्तुत घटकामध्ये 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातील कथांची वाङ्मयीन वैशिष्टे पाहू या.

निवेदन हे कथेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. त्यामुळेच ती कथा वाचकाला भावते. मनाची पकड घेत असते. प्रत्येक साहित्यकाराची लेखनाचीही एक खास ढब असते. त्यालाच आपण शैली म्हणतो. त्या त्या लेखकाची शैली ही त्यांची साहित्यामधील ओळख असते. या आधारे प्रस्तुत घटकामध्ये 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातील वाङ्मय वैशिष्ट्यांचा विचार मांडण्याचा प्रयत्न आहे.

कथा निवेदनाची शैली : संवादाची भाषा जशी महत्त्वाची असते त्याप्रमाणे निवेदनाच्या भाषेला ही महत्त्व आहे. निवेदन किंवा कथन हे कथेचे एक वैशिष्ट आहे. त्यामुळे कथाकार कथा प्रकट करण्यासाठी एक निवेदनपात्र तयार करत असतो. निवेदक पात्रांच्या दृष्टीकोणातून वाचकाला कथा सांगत असतो. वाचकाला व्यक्तीचा परिचय करून देणे, कथानक पुढे सरकवणे, मार्मिकपणे भाष्य करणे हे निवेदनातून साधले जाते.

व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहांचा अभ्यास करताना काही निवेदनपद्धतींची ओळख करून घ्यावी लागते. प्रथमपुरूषी निवेदनपद्धतीमध्ये निवेदनाला आत्मकथनपर निवेदन असेही म्हटले जाते. निवेदक हा 'मी' या सर्वनामाचा उपयोग कथनामध्ये करीत असतो तर तृतीयपुरूषी निवेदनाला सर्वसाक्षी निवेदन असेही म्हटले जाते. यामध्ये लेखक स्वतः त्रयस्थाची भूमिका घेऊन तटस्थपणे निवेदन करतो. तो कथेचा निर्माता सूत्रधार असल्याने कथातील पात्रांना आणि प्रसंगांना हवेसे स्वरूप देण्याचा प्रयत्न करत असतो. त्याला पात्र प्रसंगापासून अलिप्त राहून तटस्थपणे कथेचे कथन करावे लागते. ही तटस्थता थोडी जरी ढळली तरी कथानिवेदन अयशस्वी ठरते. या निवेदनात लेखक त्यांच्या नावाने पात्रांचे उल्लेख करतो. त्यांच्या नावाने किंवा तो, ती, ते अशी सर्वनामे

वापरून करत असतो. व्यंकटेश माडगूळकरांनी 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातील कथांसाठी प्रथमपुरुषी व तृतीयपुरूषी निवेदन पद्धती उपयोगात आणलेली आहे.

'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातील 'धर्मा रामोशी' या कथेसाठी प्रथमपुरूषी निवेदनपद्धती आलेली आहे. त्यामध्ये निवेदकसुद्धा त्या कथेतील पात्र आहे. पण त्या कथेतील दुःखामध्ये निवेदक सहभागी दिसत नाही. 'झेल्या' या कथेमध्ये प्रथमपुरूषी निवेदनपद्धती आलेली आहे. पण त्या कथेतील 'मी' निवेदक हा मास्तरचे पात्र असते. स्वतःपेक्षा 'झेल्या'च कथाभर वावरताना दिसतो.

अशाप्रकारे 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहामध्ये बहुतांशी कथा प्रथमपुरूषी निवेदनपद्धतीमध्ये असून 'बन्याबापू' व 'गणा भपट्या' या दोनच कथा तृतीयपुरूषी निवेदनपद्धतीमध्ये आहेत. तृतीयपुरूषी निवेदनाद्वारे त्यांनी 'बन्याबापू' या ब्राह्मणाचे चित्रण व गणा भपट्या या माणदेशातील भामट्याचे चित्रण जिवंत केले आहे. या पद्धतीमुळे कथा परिणामकारक झालेल्या आहेत. अशाप्रकारे माडगूळकरांनी आपल्या कथांचे निवेदन केलेले आहे.

''व्यंकटेश माडगूळकर निवेदनासाठी जी मराठी भाषा वापरतात, ती ग्रामीण भाषेचेच एका प्रमाणभाषेत बेतलेले संवादी रूप आहे. तिच्या अंतरंगाला ग्रामीणतेचा अंश जाणवतो.'' असा व्यंकटेश माडगूळकरांच्या निवेदनाच्या भाषेचा विशेष आहे. व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेतील निवेदन हे एखाद्या 'स्वगत' प्रमाणे असते. कथेची परिणामकारकता वाढविण्यासाठी ते मदत करते. त्यामधून माणदेशातील वास्तवता प्रकट होण्यास मदत होते. निवेदक मात्र भावना प्रकटीकरणावर नियंत्रण ठेवतो. 'धर्मा रामोशी' या कथेत धर्माची मुलगी बजा निवेदकाने दिलेले धोतर लुगड्यासारखे नेसून आलेली होती. एवढेच सांगून निवेदक निवेदन संपवतो. या निवेदनात काळाची जाणीव ही महत्त्वाची ठरते. धर्माला दिलेल्या धोतराचे निवेदन वर्तमानात करतो. तसेच बजाचेही निवेदन कथाकार वर्तमानकाळात करताना दिसतो. त्यामुळेच प्रथमपुरूषी निवेदन येथे परिणामकारकता वाढवते. वाचकांच्या मनावर होणारा भावनिक परिणामही सखोल, गंभीर व अंतर्मुख ठरतो.

परिसर निगडित भाषा : भाषा ही मानवी व्यवहारात अतिशय महत्त्वाचे कार्य करीत असते. किंबहुना भाषेशिवाय मानवी जीवनच संभवू शकत नाही. भाषेला मानवी जीवनात व संस्कृतीमध्ये महत्त्वाचे स्थान आहेच पण तिला मानवी व्यवहारात संप्रेषणाचे महत्त्वाचे कार्य करावे लागते. व्यंकटेश माडगूळकरांनी आपली कथा लिहिण्यासाठी जी भाषा वापरलेली आहे ती स्वतःचे वेगळेपण घेऊन येते. त्यांची भाषा विशिष्ट प्रदेशातील सत्त्वाशी निगडीत असून ती 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहामधून स्पष्ट होते.

उदाहरणार्थ; ''थोडं खाल्लं की दादा, उलीसं ठेवलंया पोरापायी. असलं कुठलं मिळतंया आमास्नी?

पोरगं खाईल दोन घास, म्हणून ठेवलं. आता त्या पोरावर समदी मदार ठेवलीया बघा. त्यो जवा कर्तासवर्ता हुईल तवा जरा बरं दिस येत्याल. तवर हे असंच. त्येला चार सबूद, कळण्यासाठी साळंत बी घालीन म्हणतूया. भनीचा दाल्ला खराचला तवा माझ्या गळी पडून. 'आता माजं कसं हुयाचं,' म्हणून रडाया लागली. तवा मी म्हणालो, 'बया' माझ्यापाशी ऱ्हा. मला तरी आता कोन हाय?'' या परिच्छेदात नवऱ्याला 'दाल्ला' असे संबोधले आहे. त्यातून शब्दाचे ग्रामीण बोलीतील रूप लक्षात येते. तद्वतच 'आमास्नी', 'समदी' ,'मदार', 'खरचला', 'ऱ्हा', 'हुयाचं' असे शब्द माणदेशातील ग्रामीणत्वाकडे झुकणारे ग्रामीण बोलीतील आहेत हे लक्षात येते.

माणदेशच्या ग्रामीण भाषेच्याद्वारे माडगूळकरांनी कथा फुलविण्याचे कार्य केले. त्यामुळे ती कथा खुलून दिसते. ग्रामीण बोलीचा आवश्यक तेथेच माडगूळकर अचूक उपयोग करतात. जेथे आवश्यकता आहे तेथे ते निवेदनात प्रमाणभाषा वापरतात. पण माणदेशच्या परिसराची ग्रामीण बोली त्यांच्या कथेत येते ती येतेच.

व्यंकटेश माडगूळकरांनी कथांमधून माणदेशी बोली आणलेली आहे. ती सहज ओघवती आहे. बोलीभाषेचा वापर हे ग्रामीण साहित्याचे अविभाज्य अंग आहे. समाजभाषेत भेद दिसतो.

● **वैशिष्ट्यपूर्ण कथाशीर्षक, वाक्प्रचार, म्हणी** : 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातील कथेतून येणारी नावेसुद्धा माणदेशी ग्रामीण परिसरातील व भाषेतील विशेष म्हणून पाहता येतात. माणसांची असलेली नावे माणदेशच्या ग्रामीण भाषेचा प्रत्यय देतात. उदाहरणार्थ : 'धर्मा', 'झेल्या', 'खंडू', 'धोंडी', 'रामा मैलकुली', 'नामा मास्तर', 'येश्या', 'यंकपराव', 'मुलाण्याचा बकस', 'कोंडीबा', 'संतू', 'शिदा', 'रघू', 'बिटा', 'नरसू' इत्यादी पुरूषांची नावे माणदेशी बोलीभाषेतून सर्रास आढळतात. या नावांच्यापैकी 'झेल्या', 'बिटा' इत्यादी नावे माणदेशाच्या बाहेर सहसा आढळत नाहीत. 'खाला', 'कमळी', 'बजा' इत्यादी स्त्रियांची नावे माणदेशी ग्रामीण भाषेत स्पष्ट दिसून येतात. ही नावे परिसराशी निगडित असल्याने वैशिष्ट्यपूर्ण वाटतात.

याबरोबरच माणदेशच्या परिसरातील काही नित्य बोलीत प्रचलित असलेले वाक्प्रचार 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहामध्ये आढळतात ते असे, 'सत्ता नसणे', 'पायरीला धोंडा असणे', 'वडावड चालणे', 'चड्डी ओली करणे', 'काटा काढणे', 'घर फोडणे', 'पुसण झालं', 'तकदीर फिरणे', 'दातखिळ बसणे', 'दाल्ल्यानं टाकणे', 'मदार ठेवणे', 'अडीच कांड्यावर येणे', 'अत्तराचे दिवे जाळणे', 'बंदीत पडणे', 'कली अंगात शिरणे', 'ढाकणाला लावणे' इत्यादी अनेक वाक्प्रचार माडगूळकरांच्या कथांतून जागोजागी आढळून येतात आणि ते प्रसंग वातावरणाशी चपखलपणे जुळून जातात. वाक्प्रचाराबरोबर त्यांच्या कथांच्या भाषेची विशिष्टता सांगणाऱ्या काही म्हणी आलेल्या आहेत. त्या म्हणींच्याद्वारे

भाषेला सौंदर्य प्राप्त झालेलं आहे. त्या म्हणी पुढीलप्रमाणे उदाहरणार्थ, 'बामणा घरी लिवणं आन् म्हाराघरी गानं', 'नवऱ्यानं मारलं आणि पावसानं झोडपलं तक्रार करायची कुणाकडं', 'काप गेलेत नि भोकं उरलेत', 'घरचं खावं अन् सरकारची नोकरी करावी' इत्यादी यावरून माणदेशातील परिसरात भाषाव्यवहार कसा होता त्यातून तेथील सामाजिकता कशी होती हे लक्षात येते. बामणं, म्हार, न्हावी, दरवेशी इत्यादी जातीचे उल्लेख हे गावगाड्याशी निगडित आहेत. ग्रामीण कथेचे संवाद व निवेदन यामधून जी बोलीरूप दाखविते त्यात बऱ्याचशा शिव्या असतात. शिव्या रागलोभाच्या छटा दाखवित असतात. म्हणूनच माणदेशच्या भाषेमधील ग्राम्यता शिव्यांमधूनही व्यक्त होते. शिव्या माडगूळकरांच्या कथांतून डोकावतात. म्हणी, वाक्प्रचार, शिव्या या खास माणदेशी प्रदेशाचे रूप दाखवतात. त्यात प्रादेशिकतेची झाक दिसते.

'वाढूळ', 'इळाभरात', 'डामरट', 'हलग्याचा वाफचा' इत्यादी कानावर सहसा न पडलेली थोडीशी दुर्बोध विशेषणे माणदेशाच्या ग्रामीण भाषेत आढळतात. हे माडगूळकरांच्या कथांचे एक भाषिक वैशिष्ट्य आहे. त्याशिवाय विशेषणाला जोडून तयार केलेली नामे हे सुद्धा एक वैशिष्ट्य आहे. उदाहरणार्थ – डामरट गाव, बोडकं माळ, मुलाण्याचा बकस, तांबोळ्याची खाला, हिरवट टाळक्याचा माणूस, गण्या भपट्या इत्यादी. या विशेषणाच्या बरोबर काही विशेष असे ग्रामीण भाषेतील शब्दही माणदेशच्या ग्रामीण भाषेची विशिष्टता लक्षात आणून देतात. उदा. : 'धारण', 'हायत्या', 'विच्छा', 'झ्याक', 'इळभर' इत्यादी.

स्वातंत्र्यपूर्व काळातील परकीय राजवटीचा परिणाम म्हणून ग्रामीण भागापर्यंत इंग्रजी शब्द पोहोचले. त्याला माणदेशचा परिसर कसा अपवाद असेल. शहरातून खेड्यात येणारा तुरळक प्रमाणातील सुशिक्षित वर्ग, शासकीय अधिकारी यांच्यामुळे हे शब्द ग्रामीण माणसांपर्यंत पोहोचले. सुरूवातीला अनुकरणातून त्याचा वापर होऊ लागला. ते वापरताना काहींचे रूप कायम राहिले. काहीचे सुलभीकरण झाले. शिवाय मराठीतील नियम वापरून ते लिहिले, बोलले जाऊ लागले. व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांमध्ये ते शब्द आले व तेच शब्द ग्रामीणतेचा स्पर्श होऊन थोडाफार बदल होऊन ग्रामीण साहित्यात रूळले असे 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातील भाषेवरून लक्षात येते. उदा. : 'किन्नर', 'ड्रायव्हर', 'बायशिकल', 'बालिस्टर', 'मिस्तरी', 'पेशल', 'थिएटर', 'शिटा', 'फारिष्ट' इत्यादी.

व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातील व्यक्ती बोलण्यापूर्वी काही क्रिया अथवा शारीरिक हालचाल करतात असे या कथासंग्रहातील कथा वाचताना लक्षात येते. याला शारीरिक हालचालीचे भाषिक रूप असे म्हणावसे वाटते. उदाहरणार्थ;

''तळव्यातली तमाखू, बोटानं चोळीत रामा म्हणाला...''

एवढं बोलून धर्मानं दाराकडं तोंड केलं आणि तो बोलला.

''बजे, आंबचा शिसा आणून दे धन्यांना.''

पण एवढ्यात मुंडाशाचं टोक खोचीत तरातरा रामा आलाच, कपाळाला हात लावूनच म्हणाला,

माणदेशी ग्रामीण बोलीत त्यांची एक वेगळी ढब दिसून येते.

''ठिक झालं! घुशी आणि ढेकूण भारी झाले होते वाड्यात!''

माणदेशच्या परिसरातील भाषेच्या बाबतीत वेगळेपण आहे. हे 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहाच्या आधारे स्पष्ट होते. या कथासंग्रहातील काही वाक्यांच्यावरून ते लक्षात येते. माडगूळकरांच्या शैलीने ही भाषेची लकब अचूक टिपली आहे. उदाहणार्थ;

''टेका हेच्यावर, का येरवाळी पाय वळवलं गरीबाकडं''

''सोताच कशाला हेलपाटा घातला जी?''

अशाप्रकारे काही वाक्यातून माणदेशी बोलीभाषेतील वेगळेपण दिसून येते. हे वरील उदाहरणांवरून लक्षात येते.

- **संवादात्मकता :** माणदेशची बोलीभाषा संवादामधून आढळते. माडगूळकरांच्या कथेमधील पात्रे आपापसात संवाद साधताना तर अस्सल माणदेश परिसराची भाषाच बोलतात. ती त्यांच्या स्वाभाविक चालीसह, तालासह येते. संवादाने कथानिवेदनाला प्रवाहीपणा येतो. तसेच संवादातून व्यक्तिमत्त्वाचे व स्वभावधर्माचेही प्रकटीकरण होते. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील संवाद प्रसंगानुरूप स्वाभाविक आहेत. त्या संवादामागे व्यक्तिमनाची भावना दडलेली स्पष्ट दिसते. उदाहरणार्थ माणदेशातील संवाद;

''घोडं थकलं आता धनी, कामधंदा हुइनासा झाला. चालता हात हुता तवर मला वाळला तुकडा मिळत हुता. ''

''आता काय? त्यात हे असं दिस आलं. वंगाळ वंगाळ, भल्या भल्यांना दोपारची भरांत पडलीया, मग आम्हा गरीबांचं काय? दोन सालं झाली. पाऊस नाही, पाणी नाही. दुष्काळ पडलाय आपल्या मुलकात पाच चिपट्यांची धारण झालीया. का घ्यायचं आन् का खायाचं? त्यात बजीला दाल्ल्यानं टाकलीया. तीबी घरी बसलीया!''

''मग पोटा पाण्याचं काय करतोस धर्मा? भागवतो कसं तरी कळणाकोंडा करून. कधी रताळं, कधी गाजरं उकडतो आन् बापलेक खातो. कालच्याला तुम्ही आला तवा पोरीनं तांदळीची भाजी आनली हुती रानातनं वटाभर. ती उकडून मीठ घालून खाल्ली. कोरकोर भाकरीसंग. बकऱ्यावानी

पालापाचोळा खाऊन जगायचं आलं कपाळी, वंगाळ!! वंगाळ!''

व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या माणदेशी कथेतून प्रादेशिक परिणाम चांगल्या पद्धतीने साधण्यासाठी उपमा व प्रतिमा यांचा वापर केलेला दिसतो. 'गणा भपट्या' या कथेत गणा हा अविवाहीत आहे. त्याच्या उतावळ्या स्वभावाचे सूचन करताना माडगूळकर 'हुरळली मेंढी आणि लागली लांडग्या मागे.' अशी खास माणदेशी उपमा वापरतात.

एकंदर व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेच वाङ्मयीन विशेष पाहावयाचे तर असे म्हणता येईल की, माडगूळकरांची कथेची भाषा अस्सल माणदेशी आहे. माणदेशी मातीचे सर्व गुणधर्म ती प्रभावीपणे व्यक्त करते. माणदेशी माणसांची बोलण्याची जी भाषा आहे, तीच माडगूळकरांच्या कथेची आहे. तेथील लोकांप्रमाणेच तिचे स्वरूपही साधे, सहज असल्याचे जाणवते. प्रत्येक लेखकाची स्वतःची अशी खास शैली असते. लेखक आणि भाषा यांचा एक आंतरिक संबंध असतो. त्यावरून शैलीची ओळख होते. माडगूळकरांची स्वतःची खास शैली लक्षात येते.

३.५ समारोप

व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहात एकूण १६ कथांचा समावेश आहे. त्या कथातून येणारे व्यक्तिचित्रणे, कौटुंबिक जीवन, समाजजीवन, निसर्गचित्र, वर्णनपरता, कथांची वाङ्मयीन वैशिष्ट्ये या घटकांचा अभ्यास आपण केला. व्यंकटेश माडगूळकरांच्या कथासंग्रहातील कथांची वाङ्मयीन वैशिष्ट्ये लक्षात घेता, त्यांच्या निवेदन शैलीचा अभ्यास करताना त्यांनी आपल्या कथांच्या निवेदनासाठी 'प्रथमपुरूषी', 'तृतीयपुरूषी' निवेदनपद्धती या दोन निवेदनपद्धतींचा उपयोग केलेला आहे.

३.६ शब्दार्थ

आंब – पहाटेच्यावेळी हरबरा या पिकावरील दवबिंदू गोळा करून बाटलीत भरून ठेवले जाणारे औषध जे पोटदुखीवर उपयुक्त ठरते.

पितळी – ताट सदृश्य भांड्याचा एक प्रकार.

शिटा – प्रवासी.

आसड– चाबूक

डामरट – उद्दाम, धटिंगण

हिरवट टाळक्याचा – गरम डोक्याचा, तापट

बंदीत – तुरूंगवास होणे

३.७ वाचन उतारा

माझं आजोळ हे एक अती डामरट गाव आहे. अख्ख्या माणदेशात प्रसिद्ध आहे. गाव गायकवाड्याचं आहे. इतरांपेक्षा त्यांचा भरणा अधिक आहे आणि ही गायकवाड मंडळी मोठी बलदंड, उफराट्या काळजाची आहेत. रांगडी आणि असंस्कृत आहेत. 'जीव घेईन', 'कुऱ्हाडीनं तोडीन' या धमक्या तिथल्या पोराबाळांच्या तोंडी आहेत. दरसाल तिथं एखाद-दुसरा खून होतो आणि काठ्या-कुऱ्हाडीच्या हाणामाऱ्या रोज.

आमचा वाटेकरी कोंडीबा गायकवाड त्यातलाच. मिशीवर पालथी मूठ फिरवत तो कुणा वाटेल त्याला दम भरतो.

''अरं, गायकवाडाचं बीज हाय! डोळा काढून हातात ठेवीन!''

कुणाचा तुच्छतापूर्वक उल्लेख करायचा असला म्हणजे म्हणतो, ''त्या गरिबाचा काय दम हाय! फराळ्यावारी जाईल!'' कुणी म्हणालं, ''अरं कोंडीबा, त्यो अंमलदार तुझ्यावर बिथरलाय!'' म्हणजे उत्तर देतो, ''अरं जा! असलं अंमलदार कोंडीबाच्या घराच्या पायरीला धोंडं असत्यात, पाय देऊन वर जात असतो!'' बस! कोंडीबापुढे सगळी दुनिया क्षुद्र आहे, गरीब आहे. त्याला वाकविणारा वीर आलम् दुनियेत नाही.

सहा महिन्यांपूर्वी मी खंड आणण्यासाठी कोंडीबाकडे गेलो. तो आपल्या घराच्या जोत्यावर बसून तुटलेला आसड नीट करीत होता. उघडाच. आपली काळी कातडी उन्हात तापवीत बसला होता, एखाद्या माजलेल्या रेड्यासारखा. सांध्यांत गाठाळलेल्या जाड बोटांनी आसड नीट करताना त्याच्या दंडावरच्या बेडक्या मागंपुढं हलत होत्या. गळ्यात पेटी, रूंद छाताडावर केसांचं जाळं, पिंढऱ्यांचे गोळेही तसेच, वरवंट्यासारखे कठीण. कोंडीबा अंगापिंडानं भलताच थोराड, उग्र.

माझ्याकडे बघितल्यावर आपला वाघासारखा जबडा उघडून गुरगुरला, ''या, मळा बघाय आला काय?''

त्याचं बोलणं नेहमी असंच राठ. मऊपणा कोंडीबापाशी औषधाला नव्हता.

मी आलो होतो खंड मागण्यापायी, पण तसं एकदम सांगण्याची सोय नव्हती. म्हणून म्हणालो, ''होय, आलो सहज. म्हटलं बघावं.''

कोंडीबाचा डावा हात सुजला होता. त्याला फडकं गुंडाळलं होतं. पंजालासुद्धा सूज होती. म्हणून मी विचारलं, ''हाताला काय झालं कोंडीबा?''

''काय न्हाई, वाईस मार लागलाय!''

''कशाचा?''

''काठ्यांचा. तुमच्या रानापायी चाललीया की झंगाझंगी! डोस्की फुटत्याती रोज. माजी गुरं त्याच्या रानात शिरली म्हणून संतू आन् त्याची दोन पोरं अंगावर आली. बाचाबाची झाली. त्यांनी काठ्या हानल्या. टकुऱ्याला लागत्याल म्हणून हात वर केला. समद्या काठ्या हातावर पडल्या ह्या!''

कोंडीबाला गावाशेजारी असं चांगलंसं रान नव्हतं, म्हणून आज कित्येक वर्ष तो आमचा मळा खंडानं करीत होता. त्याच्यावर त्याचा चांगला गुजराणा होत होता. त्याला संतू नावाचा एक मोठा भाऊ होता. त्याची आणि कोंडीबाची तेढ होती. दोघे एकमेकांचे वैरी होते. संतूनं आम्हाला कैकवेळा सांगितल, ''कोंड्या देतोय त्यापरीस पंचवीस-पन्नास मी आगाऊ देतो. त्याच्याकडून काढून मळा मला लावा.'' याउलट कोंडीबा नेहमी म्हणायचा, ''दुसरं कोण ही जमीन करतंय, बघू दे, बांधाच्या आत त्यानं पाऊल टाकलं की, त्याचा मुडदा पाडलाच म्हणून समजावं. मग फासावर का जायाचं होईना!'' इरेला पडून संतूनं आमच्या बांधाला असलेली दुसऱ्याची जमीन खंडानं केली आणि मग रोज लठ्ठालठ्ठी होऊ लागली. डोस्की फुटू लागली.

मी म्हणालो, ''अजून तुमची तेढ संपली नाही म्हणायची!''

त्यावर कोंडीबानं अगदी सहज उत्तर दिलं, ''दोघांपैकी कुनाचातरी मुडदा त्या रानात पडल्याबिगार कुटली संपतीया?''

आणि आत बघून त्यानं हाळी दिली, ''दूध बघ कुठंतरी आन् वाईसा च्या कर गं! वाटेकरी आल्यात!''

मागच्या खेपेस मी आलो होतो, तेव्हा कोंडीबाकडे एक चांगली म्हैस होती. ती आता कुठे गोठ्यात दिसत नव्हती. क्वचित मळ्यात असेल, म्हणून मी विचारलं, ''दूध बघण्याची का पाळी कोंडीबा? म्हैस आटली का काय एवढ्यात? लवकर आटली म्हणायची!''

वादीला मुरगळे मारता-मारता कोंडीबा थांबला, छातीवरचे केस चोळीत हेल काढून बोलला, ''म्हस मेली देवा. आता दुभतं न्हाई घरात!''

''आँ? मेली कशानं? चांगली हत्तीसारखी म्हैस, काय झालं एकाएकी? रोगानं मेली काय?''

''न्हाई.'' उगीच हसल्यासारखं करून कोंडीबा म्हणाला, ''माझ्या हातनंच मेली. अरवाळी होती वाईशी. एकदा धारच देईना. मस्त खटपट करून थांबलो. कासंला हात घातला की लाथ झाडायची. मला आला काव. त्या सपाट्यात ठोकली लोढण्यानं. बेसुमार ठोकली. आन् कुठं अवलगामी ठोका

बसला का काय, कुनाला ठावं. वराडली जोरकस. आवं, गरागरा अंगाभोवती फिरून धाडकन पडली खाली. पडली ती परानच गेला!''

कोंडीबानं अगदी सहजगत्या ही हकिगत सांगितली. तो हळहळला नाही की त्याच्या निबरट तोंडावर दिलगिरी दिसली नाही. स्वरात तर नाहीच नाही! त्याच्या हिशेबी, एका जनावराचा प्राण घेणं, ही अगदी मामुली गोष्ट असावी!

३.८ सरावासाठी प्रश्न व उत्तरे

वस्तुनिष्ठ प्रश्न

- **योग्य पर्याय निवडा.**

१. 'भैरवनाथ' ही व्यक्तिरेखा कोणत्या कथेत आलेली आहे?

अ) कोंडीबा गायकवाड ब) गणा भपट्या क) बिटा काका ड) राम भरोसे

२. 'धर्मा रामोशी' च्या मुलीचे नाव काय?

अ) खाला ब) बजा क) गजा ड) सजा

३. नामा मास्तर नोकरी सोडून तमाशात काय वाजवतो?

अ) ढोलकी ब) पेटी क) त्रिकोण ड) चौकोन

४. 'मुलाण्याचा बकस' मधील 'बकस' च्या वडिलांचे नाव काय?

अ) चंदूलाल ब) बाबालाल क) बाबाखान ड) रामलाल

५. तांबोळ्याची खालाचे घरदार कोणत्या गावी होते?

अ) दिघंची ब) आटपाडी क) भाळवणी ड) माळवणी

उत्तरे – १) गणा भपट्या, २) बजा, ३) त्रिकोण ४) बाबालाल ५) भाळवणी

- **दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातील धर्मा रामोशी या व्यक्तिचित्राविषयी सविस्तर लिहा.

प्रास्ताविक : 'माणदेशी माणसं' हा व्यंकटेश माडगूळकरांचा सन १९४९ साली प्रकाशित झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह. हा त्यांचा प्रसिद्ध असा व्यक्तिचित्र संग्रह आहे. मराठीतील मानदंड

म्हणावा किंवा मराठी व्यक्तिचित्रांच्या इतिहासातील एक उत्कृष्ट व्यक्तिचित्रसंग्रह म्हणजे 'माणदेशी माणसं' होय. वास्तविक या संग्रहाचे लेखन शब्दचित्र (व्यक्तिचित्र) म्हणून झाले तरी मराठी साहित्यात याचा विचार ग्रामीण कथा म्हणून झाला. व त्या प्रांतात या संग्रहाने इतिहास निर्माण करून व्यंकटेश माडगूळकरांना अव्वल दर्जाचे ग्रामीण कथा लेखक म्हणून मानाचे स्थान प्राप्त करून दिले. किंबहुना एक साहित्यिक म्हणून मराठी वाचकांना माडगूळकरांची ओळख या संग्रहानेच झाली.

विवेचन : व्यंकटेश माडगूळकरांनी बालपणापासून खेड्यात पाहिलेल्या, त्यांच्या जीवनात आलेल्या विविध सामान्य व्यक्तींचे चित्रण या संग्रहात केले आहे. या व्यक्ती लेखकाच्या दृष्टीने प्रत्यक्ष असल्या तरी वाचकाच्या दृष्टीने अप्रसिद्ध आहेत. या संग्रहात सोळा व्यक्तिचित्रे असून ती अशी; धर्मा रामोशी, झेल्या, रामा मैलकुली, नामा मास्तर, मुलाण्याचा बकस, बन्याबापू, कोंडीबा गायकवाड, शिदा चांभार, शिवा माळी, तांबोळ्याची खाला, रघू कारकून, बाबा दरवेशी, गणा महार, माझा बाप, बिटा काका, गणा भपट्या इ. या पैकी धर्मा रामोशी या व्यक्तिचित्राविषयी पुढील प्रमाणे;

धर्मा रामोशी : धर्मा रामोशी आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेला असला तरी आपल्या दारिद्र्याचे भांडवल करून, लाचार होऊन कोणाकडे भीक मागत नाही. कोणे एकेकाळी खणखणीत आणि ठणठणीत असलेले त्याचे शरीर आता विरल्या वस्त्राप्रमाणे जीर्ण झाले आहे. आपल्या हातून आता कष्ट होत नाहीत याची जाणीव झाल्यामुळे रताळं व गाजरं उकडून त्यावर आपले दिवस तो ढकलत आहे.

जातीने रामोशी असलेला धर्मा इमानदार आणि प्रामाणिक आहे. पूर्वीच्या काळात मालकीणबाईचे रस्त्यात पडलेले सोन्याचे फूल त्याने रात्रीत हुडकून आणून दिलेले असते. यावरून त्याचा प्रामाणिकपणा व मनाचा मोठेपणा सिद्ध होतो. दोन वेळच्या जेवणाला महाग झालेला धर्मा दारिद्र्य निमूटपणे, विनातक्रार सहन करीत असतो. तो दळण घेऊन जातो व दळण आणून देतो आणि त्यावर जे चार पैसे मिळतील त्यावर आपला चरितार्थ चालवितो. त्याची परित्यक्ता मुलगी 'बजा' तिला अंगभर वस्त्र नसते, तरी पण तो कसेतरी दिवस ढकलत असतो. पण दळण आणणे जेव्हा त्याला अशक्य होते तेव्हा हे काम बजीवर सोपविण्याचा तो विचार करतो. पण तिला नेसायला साडी नाही हे सांगणे त्याला प्रशस्त न वाटल्यामुळे तो लेखकाला म्हणतो, 'न्हाई जी, धोतराचा एखादा धडपा असला तर बघा. लई दिस मागीन मागीन म्हणतोय पण लाज वाटायची. थंडीचं गुंडाळायला न्हाई काय. म्हणजे त्याच्या 'बजा' ला नेसायला वस्त्र नाही आणि दोघांनाही खायला अन्न नाही तरी हा रामोशी साऱ्या व्यथा वेदनांचा ताण सहन करीत इमानाने उरलेल्या आयुष्याची वाटचाल करीत आहे. वास्तविक

ज्याच्याकडे आयुष्यभर चाकरी केली त्यांच्याकडे कोणतीही गोष्ट हक्काने मागावयास काहीच हरकत नव्हती पण तो म्हणतो, 'किती जनांचं बगावं त्यांनी? आभाळ फाटलंय, कुठं म्हणून लावावं ठिगाळ?' या रामोशाच्या बोलण्यावरून त्याचा समजूतदारपणा दिसतो. बकऱ्यावाणी पालापाचोळा खाऊन दिवस काढण्याची वेळ त्याच्यावर आली पण तो दोष आपल्या नशिबाचा आहे आणि आपल्या नशिबी जे भोग आहेत ते निमूटपणे सोसलेच पाहिजेत ही त्याची प्रामाणिक भावना असल्यामुळे कोणतीही तक्रार न करता तो जीवन कंठतो. धर्मा रामोशीचा सहनशीलपणा लेखकाने प्रत्ययकारीपणे चित्रित केला आहे.

समारोप : माडगूळकरांनी चित्रित केलेल्या ग्रामीण जीवनाचे, तिथल्या सामाजिकतेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे तेथील दारिद्र्य. ह्या दारिद्र्याचे दर्शन घडविले जाईल. अशाच व्यक्तिरेखा माडगूळकरांनी आपल्या कथांमध्ये चित्रित केलेल्या दिसतात व ह्या दारिद्र्याचे विविध प्रकारचे परिणाम भिन्न भिन्न व्यक्तीवर कसे होतात हे व्यक्तिचित्रणाच्याद्वारे दाखवून देतात.

धर्मा रामोशीचे व्यक्तिचित्रण करताना व्यंकटेश माडगूळकर त्याची दयनीय अवस्था तर दाखवितातच शिवाय त्याची अगतिकता, सोशिकपणाही दाखवतात. मानवी जीवनाच्या दुःखाची खोल अशी जाणीव माडगूळकरांच्या मनात सतत असताना दिसते.

२. कोंडीबा गायकवाडचे स्वभाव चित्र रेखाटा.

प्रास्ताविक : व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या कथेत माणदेशचा परिसर रंगविला. त्यांच्या कथेतील माणसे ही प्रामुख्याने माणदेशाच्या परिसरातील आहेत. अनेक व्यक्ती, घटना व प्रसंगांच्या अनुषंगाने माडगूळकरांनी आपल्या कथेत माणदेश जिवंत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. समाजातील कोणताही घटक त्यांनी आपल्या लेखनात दुर्लक्षिला नाही. त्यांच्या कथेत महार, मांग, कुणबी, मराठा, ब्राह्मण, मुसलमान एवढेच नव्हे तर रामोशी, दरवेशी अशी सर्व सामाजिक स्तरातील माणसे वावरताना दिसतात. जहांगिरदारापासून ते दारिद्र्यात खितपत पडलेल्या सामान्य माणसांपर्यंत अशा विविध स्तरातील लोकांचे चित्रण त्यांच्या कथेत आढळते.

विवेचन : माणदेशचा मुलुख कोरडा ठणठणीत असल्यामुळे सतत दुष्काळाला तोंड देणे तेथील लोकांना क्रमप्राप्त होते. परिस्थितीचा परिणाम जसा समाजजीवनावर होतो तसा माणसाच्या स्वभावावरही होतो. व याचे उत्तम उदाहरण म्हणजे कोंडीबा गायकवाड होय.

कोंडीबा गायकवाड : एक दणकट, राकट व उग्र माणसाची कथा आहे. 'जीव घेईन', 'कुऱ्हाडीनं तोडीन' ही त्याची इतरांशी बोलताना बोलली जाणारी भाषा. त्याला आपल्या सामर्थ्यावर

इतका विश्वास असतो की, तो अंमलदारांनाही घाबरत नसतो. तो अंमलदारांच्या बाबतीत बोलताना नेहमीच असे म्हणे, 'अरं जा, असलं अंमलदार कोंडीबाच्या घराच्या पायरीला धोंडं असत्यात, पाय देऊन वर जात असत' या त्याच्या उद्‌गारातून त्यांच्या पुढे सारी दुनिया क्षुद्र आहे हे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे त्याला वाकविणारा वीर अलम दुनियेत नाही हेही दिसते. खंडाने शेती करणाऱ्या शेतकऱ्यासारखी त्यांची वृत्ती नाही. तर त्याची वृत्ती आक्रमक आहे.

कोंडिबाची अनेकविध रूपे आपल्याला या कथेत पहावयास मिळतात. हा कोंडीबा संतूच्या पोरांच्या काठ्या एका हातावर झेलतो त्यातून त्याचा रगेलपणा दिसतो. तो अपमान त्याच्या मनात सतत धुमसत राहतो. संधी मिळताच संतूच्या डोक्यात दगड घालून ठार मारतो. आणि स्वतः पोलिस चौकीत आपला गुन्हा कबूल करण्यासाठी जातो. येथे त्याचा प्रामाणिकपणा दिसतो. मात्र जेंव्हा खंड मागायला मालक येतो तेंव्हा, 'अन्नाच्यान, लबाड बोलत न्हाई. ईख खाईन म्हणल तर पैसा न्हाई. वैरणीला वाईसा भाव येऊ द्या. इकीन आन् देईन. मी का पैका बुडवतोय तुमचा?' असा उलटा सवाल मालकाला करतो. विष खायला पैसा नाही म्हणून शपथेने सांगणारा कोंडीबा श्रावण्याला मारल्याबद्दल तीनशे रूपये दंड भरतो. तो अतिशय बेदरकार, बेडर वृत्तीचा आहे. आपण केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल किंवा गुन्ह्याबद्दल त्याला खंत वाटत नाही. संतूच्या आरोपावरून जेंव्हा त्याला तुरुंगवास होतो आणि पोलिस जेंव्हा त्याला घेऊन जाऊ लागतात तेव्हा त्याची बायको रडू लागते. कोंडिबाला बायकोचे रडणे अजिबात आवडत नाही. तो तिला म्हणतो, 'गप्प् रडायला का झालं? अवंदा पिक चांगलं हाय मळ्यात जुंधळ्याच डांबार लागलंय खंडी दीड खंडी दाणं येत्याल.' यातून कोंडीबाच्या उलट्या काळजाचे दर्शन घडते.

समारोप : या कथेतून खेड्यातील लोकांचे आपल्या जमिनीवर असणारे प्रेम दिसते. हा त्यांच्या मानसिकतेचा एक महत्त्वाचा भाग आहे. जमिनीवरून ते वाटेल ते करतील. प्रसंगी ते खून करायलाही मागे पुढे पहात नाहीत. हे कोंडीबाच्या वर्तनावरून स्पष्ट होते.

३.८ सरावासाठी प्रश्न :

वस्तुनिष्ठ प्रश्न

- **योग्य पर्याय निवडा :**

१. 'बन्याबापू' च्या विधवा सुनेचे नाव काय?

अ) आरूबाई ब) पारूबाई क) सखुबाई ड) सरूबाई

२. 'राधू' ही व्यक्तिरेखा कोणत्या कथेत आली आहे?

अ) धर्मा रामोशी ब) रामा मैलकुली क) कोंडिबा गायकवाड ड) शामा

३. कोंडीबा गायकवाड डोक्यात दगड घालून कोणाचा खून करतो?

अ) अंतू ब) संतू क) पंतू ड) दिगू

४. शिवा माळी या कथेतील म्हादू सोनाराला कशाचा नाद होता?

अ) चिलमीचा ब) गांजाचा क) बिडीचा ड) सिगारेटचा

५. रघू कारकूनचे शिक्षण किती झाले होते?

अ) चौथी ब) सातवी क) दहावी ड) अकरावी

- **दीर्घोत्तरीय प्रश्न**

१. व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातील भाषा विशेष लिहा.

२. नामा मास्तर, शिदा चांभार, गणा महार या कथांच्या आधारे दलित जीवनाचे चित्रण करा.

- **लघुत्तरी प्रश्न**

१. 'झेल्या' या कथेतील 'जालंधर एकनाथ लोहार' चे व्यक्तिचित्र रेखाटा.

२. 'बन्या बापू' या कथेतील 'बापू' या व्यक्तिरेखेची शोकांतिका तुमच्या शब्दात लिहा.

३.९ अधिक वाचन

१. कडुलिंबाची सावली : उद्धव शेळके

२. व्यक्तिशोध : प्रभाकर पाध्ये

३.१० उपक्रम

खेड्यातील बोली भाषेतील शब्द, वाक्प्रचार, म्हणी, उखाणे गोळा करा.

◆◆◆